# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:10.06.2025** **वार:मंगळवार**

---

1. विविध क्षेत्रात सरकारने लोककेंद्रित, सर्वांगीण प्रगतीला प्राधान्य दिल्यानं गेल्या 11 वर्षांत देशात उल्लेखनीय परिवर्तन झाल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन,
2. राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारची 11 वर्षं संकल्प, समर्पण आणि सार्वजनिक सेवेसाठी सुवर्णकाळ ठरल्याचं गृहमंत्री अमित शहा यांचं मत,
3. विशेष आर्थिक क्षेत्र अर्थात सेझमध्ये उच्चतंत्रज्ञान केंद्रित उत्पादनाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारची धोरण शिथिलीकरणाची घोषणा,
4. सीमावर्ती भागात नुकसान झालेल्या घरांसाठी 25 कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद, आणि
5. ॲक्सियम-4 मोहिमेचा शुभारंभ प्रतिकूल हवामानामुळे एका दिवसानं लांबणीवर.

**<u>मोदी</u>**

140 कोटी भारतीयांचे आशीर्वाद आणि सर्वांच्या सामूहिक सहभागामुळे गेल्या 11 वर्षांत देशात विविध क्षेत्रांमध्ये वेगवान परिवर्तन घडलं असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या नेतृत्वाखालील सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील सरकारला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त त्यांनी काल समाजमाध्यमावर संदेश प्रसारित केला.

'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास' या तत्त्वानुसार काम करत राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने जलद गतीनं, सर्वसमावेशक आणि संवेदनशीलतेनं अभूतपूर्व बदल घडवून आणले आहेत, असं पंतप्रधान मोदी यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. आर्थिक विकासापासून सामाजिक उन्नतीपर्यंत विविध क्षेत्रात सरकारनं लोककेंद्रित, सर्वांगीण प्रगतीला प्राधान्य दिलं असल्याचं मोदी यांनी अधोरेखित केलं.

आज भारत फक्त सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्थाच नाही, तर हवामान बदल आणि डिजिटल नवोन्मेष यासारख्या महत्त्वाच्या विषयांचं एक प्रमुख जागतिक केंद्र देखील आहे. विकसित भारताच्या उभारणीचा नवा संकल्प, नवी आशा आणि आत्मविश्वासानं भारताची प्रगतिपथावर वाटचाल सुरू आहे, असं पंतप्रधानांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. नमो ॲपवर विविध चित्रफिती, इन्फोग्राफिक्स आणि लेखांच्या माध्यमातून भारताच्या विकास यात्रेची गाथा मांडण्यात आली आहे, नागरिकांनी नमो ॲपवरील ही माहिती जाणून घ्यावी, असं आवाहनही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे.

शहा

'गेल्या 11 वर्षांच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारमुळे देशानं आर्थिक पुनरुज्जीवन, सामाजिक न्याय, सांस्कृतिकतेचा अभिमान आणि राष्ट्रीय सुरक्षेचं एक नवं पर्व पाहिलं', असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. ही ऐतिहासिक 11 वर्षं संकल्प, समर्पण आणि सार्वजनिक सेवेसाठी सुवर्णकाळ ठरली आहेत. देशाचं नेतृत्व स्पष्ट, दृढनिश्चयी आणि सार्वजनिक सेवेवर लक्ष केंद्रित करणारं असतं, तेव्हा सेवा, सुरक्षा आणि सुशासन यांचे नवे टप्पे गाठले जातात, असं शहा यांनी आपल्या समाजमाध्यमांवरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

अकरावर्ष

सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांना प्राधान्य देऊन काम केल्यानं गेल्या 11 वर्षांत देशात उल्लेखनीय परिवर्तन घडलं आहे. सरकारनं महत्त्वाच्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रीत करून आमूलाग्र बदल घडवले आहेत. यात एक महत्त्वाचं क्षेत्र आहे, ते म्हणजे पर्यावरण संवर्धन आणि विकास. या क्षेत्रातील परिवर्तनाचा आढावा ऐकूया प्राची गावस्कर यांच्याकडून...

**गेल्या दशकात, भारतानं पर्यावरण संरक्षण आणि समावेशक विकासाला एकत्रित करणारे विकास प्रारूप स्वीकारले आहे. नद्यांचे पुनरुज्जीवन करण्यापासून ते परिसंस्था पुन्हा मजबूत करण्यापर्यंत आणि हरित पायाभूत सुविधानिर्माण करण्यापर्यंत दृढ वचनबद्धता दर्शविली आहे. नमामि गंगे मिशन हा जगातीलसर्वांत मोठ्या नदी पुनरुज्जीवन कार्यक्रमांपैकी एक आहे. यासोबतच, स्वच्छ भारत मिशन आणि गोबरधन योजनेनं स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनात बदलघडवून आणला आहे, गोबरधन योजनेमुळे ग्रामीण भागात स्वच्छताआणि ऊर्जा आत्मनिर्भरता दोन्हीला चालना मिळत आहे. 'एक पेडमाँ के नाम' सारख्या मोहिमांमुळे पर्यावरणीय कृतीसाठी नागरिक एकत्र झाले आहेत. भारताने वन्यजीव संवर्धनातही लक्षणीय प्रगती केली आहे. प्रोजेक्टचित्ता, प्रोजेक्ट लायन आणि विस्तारित प्रोजेक्ट टायगर सारखेउपक्रम अधिवास विकास आणि या प्रजातींच्या रक्षणावर लक्ष केंद्रित करतात. भारतात सध्या आशियातील सर्वाधिक 91 रामसर स्थळं आहेत. 13 भारतीय समुद्रकिनाऱ्यांनाप्रतिष्ठित ब्लू फ्लॅग प्रमाणपत्र मिळाले आहे, भारताचे हरितपरिवर्तन हा केवळ धोरणात्मक उपक्रम नाही, तर ती लोकचळवळ आहे,जबाबदारी आहे आणि भविष्यातील पिढ्यांसाठी आश्वासक आधार आहे.**

**<u>ओम बिर्ला</u>**

'देशातील तरुणाईमध्ये असलेली प्रतिभा आणि तंत्रज्ञानातील नवोन्मेष यांच्या सामर्थ्यावर भारत समकालीन आव्हानांना सामोरे जात आंतरराष्ट्रीय नेतृत्व म्हणून उभा राहात आहे', असं लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी म्हटलं आहे. ते काल आयआयटी जोधपूर इथं बोलत होते. बिर्ला यांनी समाज, अर्थव्यवस्था आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीत देशातील युवकांच्या योगदानाचा गौरव केला. भारताच्या युवा पिढीचा देशाच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण वाटा आहे, असं स्पष्ट करत त्यांनी विद्यार्थ्यांना देशाच्या विकासासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचं आवाहन केलं.

**<u>सेझ</u>**

केंद्र सरकारनं विशेष आर्थिक क्षेत्र अर्थात सेझमध्ये उच्चतंत्रज्ञान केंद्रित उत्पादनाला चालना देण्याच्या उद्देशानं धोरण शिथिलीकरणाची घोषणा केली आहे. विशेषतः सेमीकंडक्टर्स आणि इलेक्ट्रॉनिक घटकांच्या निर्मितीला अधिक चालना देण्यासाठी ही सवलतींची मालिका लागू करण्यात येत आहे. या क्षेत्रासाठी घसघशीत गुंतवणूक आकर्षित करणं, नियामक प्रक्रियेतील अडचणी कमी करणं आणि पर्यायानं भारताचं जागतिक सेमीकंडक्टर मूल्य श्रृंखलेतील स्थान मजबूत करणं हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

सेझ नियम 2006 च्या अंतर्गत नियम पाचमध्ये सुधारणा करण्याचाही यामध्ये हेतू असून त्यामुळे सेमीकंडक्टर किंवा इलेक्ट्रॉनिक घटक उत्पादनासाठी वापरण्यात येणाऱ्या सेझमधील जागेचा 50 हेक्टरचा नियम शिथिल करून तो 10 हेक्टरपर्यंत कमी करण्यात येणार आहे. याशिवाय नियम 07 मध्येही सुधारणा करण्यात आली आहे. त्यामुळे मंजुरी मंडळाला केंद्र किंवा राज्य सरकार किंवा त्यांच्या अधिकृत एजन्सींच्या कर्जावर किंवा भाड्यावर घेण्यात आलेल्या जमिनीबद्दलचे नियम शिथिल करण्याचे अधिकार मिळणार आहेत.

**<u>निर्मला-एनआयआयएफ</u>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली काल नवी दिल्लीत राष्ट्रीय गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा निधी अर्थात एनआयआयएफच्या नियामक परिषदेची सहावी बैठक पार पडली. यावेळी अर्थमंत्री आणि परिषदेच्या सदस्यांनी

एनआयआयएफची कामगिरी, सध्याचं धोरण आणि भविष्यातील दृष्टिकोन याबाबत चर्चा केली. पायाभूत सुविधा आणि भारतीय अर्थव्यवस्थेच्या इतर प्रमुख क्षेत्रांमध्ये भांडवल उपलब्ध करण्यात एनआयआयएफची भूमिका महत्त्वाची आहे.

**<u>गृह मंत्रालय-भरपाई</u>**

सीमावर्ती भागात नुकसान झालेल्या 2060 घरांसाठी सरकार 25 कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद करणार असल्याचं गृह मंत्रालयानं जाहीर केलं आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर जम्मू आणि काश्मीरच्या सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये पाकिस्ताननं केलेल्या गोळीबारामुळं नुकसान झालेल्या घरांसाठी अतिरिक्त भरपाई देण्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केल्यानंतर गृह मंत्रालयानं हा निर्णय घेतला आहे. पंजाबच्या सीमावर्ती भागातही अशीच भरपाई दिली जाईल, असंही गृह मंत्रालयाने म्हटलं आहे. पंतप्रधानांनी पूर्णपणे नुकसान झालेल्या प्रत्येक घरासाठी दोन लाख रुपये आणि अंशतः नुकसान झालेल्या प्रत्येक घरासाठी एक लाख रुपये अतिरिक्त भरपाईची घोषणा केली आहे.

**<u>ॲक्सियम-4</u>**

भारताचे अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांना अंतराळात घेऊन जाणाऱ्या ॲक्सियम-4 मोहिमेचा शुभारंभ प्रतिकूल हवामानामुळे एका दिवसानं पुढे ढकलण्यात आला आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी दिलेल्या माहितीनुसार, या उड्डाणाची नियोजित वेळ आंतरराष्ट्रीय प्रमाणवेळेनुसार आज संध्याकाळी साडेपाच होती. ही ऐतिहासिक मोहीम अमेरिका, भारत, पोलंड आणि हंगेरीतील चार अंतराळवीरांना 14 दिवसांच्या वैज्ञानिक मोहिमेसाठी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर घेऊन जाणार आहे. ॲक्सियम-4 (AX-4) मोहिमेत भारतातील शुभांशू शुक्ला यांच्यासह पोलंडमधील स्लावोज़ उझनांस्की, हंगेरीमधील तिबॉर कपु आणि अमेरिकेतील पेगी व्हिटसन यांचा या मोहिमेत समावेश आहे. अंतराळवीर 31 देशांमधून सुमारे 60 वैज्ञानिक प्रकल्पाचा अभ्यास करणार आहेत. त्यामध्ये इस्रोच्या नेतृत्वाखालील काही महत्त्वाचे संशोधन प्रकल्प आहेत.

**<u>पुरस्कार</u>**

कोल्हापूर इथल्या राजर्षी छत्रपती शाहू स्मारक न्यासाच्या वतीनं दिला जाणारा शाहू पुरस्कार यंदा ज्येष्ठ दिग्दर्शक डॉक्टर जब्बार पटेल यांना जाहीर झाला आहे. पुरस्काराचं हे 39 वं वर्ष आहे. कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे यानी काल कोल्हापूर इथं वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीदिनी हा पुरस्कार प्रदान केला जाईल. 1 लाख रुपये, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

**<u>हवामान</u>**

किनारी कर्नाटक आणि कर्नाटकचा अंतर्गत भाग, केरळ, महे, ओडिशा, रायलसीमा, तमिळनाडू, पुडुचेरी आणि कराईकल तसंच उत्तरेकडील राज्यांवर वादळी वाऱ्यांसाह जोरदार पर्जन्यवृष्टीचा अंदाज हवामान विभागानं वर्तविला आहे. किनारी आंध्र प्रदेश, अंदमान आणि निकोबार द्वीपसमूह, छत्तीसगड, झारखंड, मराठवाडा, रायलसीमा आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये वादळी वारे आणि वीजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. तर दिल्ली, हरियाणा, चंडगड, जम्मू आणि काश्मीर, लडाख, मध्यप्रदेश, पंजाब, राजस्थान आणि उत्तर प्रदेशातील काही भागांमध्ये उष्णतेच्या लाटेचा अंदाज आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं,

## नमस्कार.